# भारतीय महिलांची दशा आणि दिशा

**प्रा.सौ. धनश्री राणे**
सहाय्यक प्राध्यापक
भवभूती महाविद्यालय, आमगांव

---

स्त्री आणि पुरूष ही सृष्टी रचियत्याची एक सुंदर उत्पत्ती आहे. दोन्हीच्या सहाय्यानेच हया सृष्टीत निरंतरता आहे. दोन्ही एक दुसऱ्यांचे पूरक आहेत. इतिहासावरून लक्षात येते की, अनंत काळापासून पुरूषांनी स्त्रियांवर अधिपत्य गाजवले आहे. आजही काही प्रमाणात ही परिस्थिती समाजात दिसून येते. कोणत्याही देशाची किंवा समाजाची श्रेष्ठता, दर्जा त्या देशातील महिलांच्या स्थितीवरून लक्षात येते. समाजातील महिलांचे स्थान, गौरव, प्रतिष्ठा, शिक्षण हा त्या समाजाचा आरसा असतो.

इतिहासावरून आपल्या लक्षात येते की, वेगवेगळया काळात महिलांची स्थिती भिन्न भिन्न होती.

**१) वैदिक काळ : (१५०० — १००० ई.पु.)**

वैदिक काळात महिलांची स्थिती अत्यंत उन्नत, श्रेष्ठ होती. सासर आणि माहेर दोन्ही ठिकाणी तिला उचित सम्मान मिळत असे. धार्मिक कार्य असो वा सामाजिक; प्रत्येक ठिकाणी स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने कार्य करीत होत्या. त्या काळात स्वयंवर प्रथा असल्याने महिलांना आपला जोडीदार निवडण्याची पूर्ण स्वतंत्रता होती. विधवांना सन्मानजनक वागणूक व पतीच्या सम्पतीमध्ये अधिकार होता.

**२) उत्तर वैदिक काळ : (१०००—६०० ई.पु.)**

या कालखंडापासून महिलांच्या स्थितीमध्ये परिवर्तन होण्यास सुरूवात झाली. बौद्धिक दृष्टीने महिला पुरूषांपेक्षा कमी आहेत ही भावना समाजात रूढ होऊ लागली. परंतु सामाजिक व धार्मिक क्षेत्रात जास्त बदल झालेला त्या काळात दिसून येत नाही.

**३) मध्य काळ : (१०००—१७०७ ई.पु.)**

या कालखंडापासून महिलांच्या स्थितीला उतरती कळा लागली. मनुस्मृतीत स्पष्टपणे लिहिले आहे की, महिलांनी नेहमी पुरूषांच्याच संरक्षणात असायला पाहिजे. वडिल, पती आणि मुलांच्या संरक्षणात वेगवेगळया अवस्थेत राहायला पाहिजे. या काळात ब्राम्हणांच्या विचाराचा पगडा समाजात वाढू लागला. कर्मकाण्ड आणि अंधश्रद्धा समाजात वाढू लागली. जस जसे मुगल साम्राज्य भारतात आपले पाय रोवू लागले, तसी महिलांची दशा बिघडू लागली. महिला संबंधीचे नियम प्रथा कठिण होऊ लागल्या. याच काळात पडदाप्रथेचा पुरस्कार करण्यात आला. मुस्लिमांचे स्त्रियांवरील अत्याचार पाहून हिंदू समाज आपल्या लहान लहान मुलींचे लग्न करून देत असत. स्त्रियांचे सर्व अधिकार विशेषत: सांपत्तिक अधिकार काढून घेण्यात आले आणि ती पूर्णपणे हळू हळू पुरूषावर निर्भर झाली.

**एकोणिसाव्या शतकात महिलांची स्थिती :**

या कालखंडात महिलांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. समाजातील कुप्रथांना नष्ट करण्यासाठी कायदे करण्यात आले. १८५६ मध्ये हिंदू—विधवा विवाहासाठी कायदा करण्यात आला. विधवांना पती गेल्यानंतर संपत्तीत अधिकार मिळाले. लार्ड विलीयम बेंटिक यांनी १८२९ साली सतीची चाल कायदयाने बंद केली. या कालखंडात महिलांची स्थिती सुधारण्यासाठी स्वामी दयानंद सरस्वती, श्रीमती एनी बेझेन्ट, गोपालकृष्ण गोखले, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, यांनी विशेष प्रयत्न केले. तसेच स्वातंत्र्यापूर्वी

वेगवेगळी आंदोलने होऊ लागली त्यातही महिलांचा सहभाग मोठया प्रमाणात होता. तरी सुद्धा त्या धर्माशी इतक्या जोडल्या होत्या की त्यातून बाहेर निघणे हे अतिशय कठीण होते.

**स्वतंत्र भारतात महिलांची स्थिती :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुरूवातीच्या काळात महिलांच्या स्थितीत विशेष सुधारणा झाली नाही. १९७१ मध्ये श्रीमती इंदिरा गांधीच्या शासनकाळात प्रथमच 'स्टेट्स ऑफ वुमैन कमेटी' चे गठन करण्यात आले. या कमिटीने भारतातील स्त्रियांच्या स्थितीचे सर्वेक्षण केले आणि १९७५ साली रिपोर्ट सादर करण्यात आले. त्यानुसार महिलांच्या विकासात रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यामुळे बाधा निर्माण होत असल्याचे निष्पन्न झाले. समाजात आदर्श महिला त्या होत्या ज्या कधीही घराबाहेर निघाल्या नाही. ज्यांनी आपल्याकरिता काही मागितले नाही आणि नि:स्वार्थ भावनेने आपले जीवन दुसऱ्यांकरिता जगल्या.

स्वातंत्र्याच्या पूर्वाधात महिलांवर धर्माचा पगड़ा इतका जबरदस्त होता की, त्यांना स्वतंत्रता, आपले अधिकार या विषयीची जाणीवही नव्हती. अधिकारांसाठी लढणाऱ्या महिलांना मृत्युदंड देण्याची घोषणा केली जात असे किंवा समाजाकडून अशा महिलांना त्रासही सहन करावा लागत असे. परंतु मागील ५० वर्षाचा आपण आढावा घेतला तर महिलांच्या स्थितीत क्रांतिकारी परिवर्तन झालेले दिसून येतात.

**१) शैक्षणिक परिवर्तन :**

जसजशी स्त्रियांमध्ये शिक्षण विषयक जागृती येत आहे तसतशी शिक्षण क्षेत्रात महिला प्रगती करीत आहे. प्राचीन रूढी, परंपरांना मागे टाकून सर्वच क्षेत्रात आजच्या महिला समोर जात आहेत. सरकारही स्त्री शिक्षणावर विशेष लक्ष देत आहे. आज मोठ मोठया सरकारी आणि राजनैतिक पदावर महिला दिसून येतात. सहशिक्षणामुळे विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना सुद्धा एक दुसऱ्यांच्या विचारांना समजण्यास वाव मिळतो.

**२) समाज सुधार आंदोलनात सहभाग :**

महिलांची स्थिती सुधारण्यासाठी पूर्वी बरीचशी आंदोलने झाली. जसे – सतीप्रथेचा विरोध, विधवा पूनर्विवाह, बाल विवाह, बहुपत्नि विवाह इत्यादी आजही आपण समाजात पाहतो की, महिला आपल्या अधिकारांसाठी धरणे, आंदोलने करतांना दिसतात. दारूबंदीसाठी गावपातळीवर महिला आजही लढतांना दिसतात.

**३) सामाजिक परिवर्तन :**

जसजसा महिलांमध्ये शिक्षणाचा प्रभाव वाढू लागला तसतसा समाजात आमुलाग्र बदल होऊ लागला. मुख्य म्हणजे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊ लागले. त्यामुळे स्त्रिया स्वतंत्र विचार करू लागल्या. त्यांना आपल्या जबावदारीची जाणीव लवकरच होऊ लागली. परिणामी त्यांच्यात निर्णय क्षमता वाढीस लागली.

**४) पाश्चात्य संस्कृती आणि साहित्याचा प्रभाव :**

वैज्ञानिक शिक्षणाचा प्रसार व इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाने भारतीय महिलांमध्ये नवीन जागृती झालेली दिसून येते. पाश्चात्य देशात स्त्री व पुरूषांना समान अधिकार आहेत. त्यामुळे भारतीय महिलाही आपल्या अधिकाराबद्दल जागरूक झालेली दिसते. महिलांनी भौतिकप्रगती सुद्धा मोठया प्रमाणात केली आहे.

औद्योगीकरण व जागतिकीकरणामुळे देशात मोठे मोठे उद्योग धंदे उभारण्यात आले. त्यामुळे महिलांना नौकरीच्या संधी प्राप्त झाल्या व पुरूषांच्या बरोबरीने महिला अग्रेसर होतांना दिसत आहेत.

**५) आर्थिक परिवर्तन :**

हिन्दू उत्तराधिकार अधिनियम सन १९५६ नुसार संपत्तीमध्ये स्त्रियांच्या मालकी हक्काच्या दृष्टीने जी तरतूद करण्यात आली. त्यानुसार या अधिनियमाच्या धारा १४ नुसार संपत्तीविषयक हक्कात स्त्रियांना निरपेक्ष

रूपाने स्वामित्व प्रदान करण्यात आले. तसेच पैतृक किंवा स्वअर्जित केलेली संपत्ती यात मुलगा, नातू, नातवाचा मुलगा (पडनातु) यांना जन्मत: संपत्तीचा अधिकार प्राप्त होतो. महिलांचे आर्थिक सशक्तीकरण व रोजगार प्राप्तीसाठी स्वयंसहायता बचत गटाचे मोठया प्रमाणात योगदान आहे. महिलांच्या एकूणच व्यक्तिमत्व विकासाकरिता महिला बचत गटाची भूमिका महत्वपूर्ण आहे.

**६) पारंपरिक वैवाहिक स्थिती परिवर्तन :**

अलीकडच्या काळात उच्च शिक्षित व नोकरी करणाऱ्यांच्या विवाह विषयक विचारांमध्ये बरेच परिवर्तन होऊ लागलेले आहे. मुला–मुलींना आपल्या आवडीचा जोडीदार मिळाल्यास ते मुक्तपणे विवाह बंधनात अडकतात असे दिसून येते. परिणामी दहेज प्रथेसारखी सामाजिक कुप्रथा नष्ट होण्यास मदत मिळत असल्याचे लक्षात येते व आतरजातीय विवाहालाही चालना मिळते.

वरील संपूर्ण स्थितीचा आढावा लक्षात घेतल्यास असे दिसून येते की, महिलांच्या स्थितीत कितीतरी परिवर्तन घडून आले. सुधारणात्मक धोरण, सरकारी प्रयत्न व कायदयांमुळे स्त्रियांमध्ये बरीच सुधारणा झालेली दिसून येते. परंतु अनेक क्षेत्रात आजही महिला वर्ग अजूनही पुरूषांपेक्षा मागे आहे. आजही महिला सामाजिक रूढी, रितीरिवाज, अंधश्रद्धा यात जकडलेली आहे. आजही समाजात स्त्री भृणहत्या, स्त्री आत्महत्या, स्त्री बलात्कार, लिंगभेद, दहेज प्रथा अशा कितीतरी अमानुष प्रथा मोठया प्रमाणात दिसून येतात. वरवर पाहता महिला सशक्त दिसत असल्या तरी आजही त्या शोषित आहेत. ग्रामीण, अतिदुर्गम भागात, डोंगराळ भागात आजही महिलांची अवस्था फारसी समाधानकारक नाही. भारतात शहरी आणि ग्रामीण जीवनमानात आजही फार तफावत दिसून येते.

बेकारी, कर्जबाजारीपणा, व्यावसायिक अडचणी, उपासमार, अनारोग्य अशा समस्या आजही ग्रामीण भागात दिसून येतात. भारतात ७० ते ८०% स्त्रियांची संख्या ग्रामीण भागात आहे. ५०% महिला शेतीची कामे करतात. या महिला असंघटीत आहेत. ८ ते १० तास त्यांना शेतीची कामे करावी लागतात आणि सोबत घरकाम, मुलांचे संगोपन, इतर व्यक्तिंची सेवा, जनावरांची काळजी, इंधन गोळा करणे अशी कामेही त्या करतात.

## ग्रामीण महिलांच्या समस्या

**१) शिक्षण क्षेत्रातील समस्या :**

ग्रामीण भागात पुरूषांपेक्षा महिला साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते. पारंपरिक दृष्टिकोन आजही या भागात बदललेला दिसून येत नाही. पालकवर्ग मुलीच्या विकासाकडे पाहिजे तेवढया प्रमाणात लक्ष देत नाही. शिक्षणाच्या प्रती अनास्था आजही कायम आहे. एका सर्वेक्षणानुसार ५०% मुली प्राथमिक स्तरावर शाळा सोडून जातात. शेतीतील कामे, घरकाम, लहान भावंडांना सांभाळणे अशी कितीतरी जवाबदारी ग्रामीण मुलींकडे असते त्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. अतिर्दुगम व डोंगराळ भागात आजही रस्ते नाही. आदिवासी महिलांना शिक्षणासाठी असलेल्या सरकारच्या योजना त्यांच्या पर्यंत पोहचत नाही म्हणून या विकास योजनेचे फायदे यांना होत नाही. मुलीपेक्षा मुलांना जास्त महत्व या भागात दिसून येतो.

**२) आरोग्य क्षेत्रातील समस्या :**

ग्रामीण भागात मूलभूत गरजांची कमतरता प्रकर्षाने दिसून येते. पौष्टिक आहार, स्वच्छ पेयजल, आवास तसेच चिकित्सा सुविधा यांचा अभाव मोठया प्रमाणात आजही आहे. आजही २,३ किलोमीटरवरून पाणी भरावे लागते. गर्भावस्थेत रक्तअल्पता, कुपोषण या समस्या मोठया प्रमाणात आहेत. आहाराविषयी

अज्ञान हे ही एक कुपोषणाचे कारण आहे. मातामृत्युदर डोंगराळ व दूर्गम भागात जास्त दिसून येतात. कारण काही भागात आजही रूग्णवाहीका जाऊ शकत नाही. ग्रामीण भागात मंत्र तंत्रावर आजही विश्वास आहे. प्रकृती स्वास्थ्य बिघडले की, जनता रूग्णालयात न जाता मांत्रिकाकडे जातात. त्यामुळे माता आणि शिशु मृत्युदर जास्त दिसून येते.

**३) रोजगार विषयक समस्या :**

ग्रामीण भागातील रोजगार शेतीशी व जंगलाशी संबंधित आहे. शेतीचे व्यापारीकरण झाले. उद्योगधंदयात थोडया प्रमाणात वाढ झाली. परंतु या सुधारणेचे फायदे वरिष्ठ वर्गालाच अधिक झालेले आहेत. ग्रामीण शेतमजुर महिला, गरीब, दलित, आदिवासी महिला यांच्या जीवनमानात आजही जास्त बदल झालेला नाही. बरोबरीच्या कामातही पुरूषांपेक्षा कमी मजुरी महिलांना दिली जाते. गृहकार्यातून या महिलांना कधीच सुटका नसते. या महिलांना श्रम जास्त करावे लागतात. बरेचदा पूर्ण मजुरीही या महिलांना मिळते किंवा नाही याबद्दल शंकाच आहे. पुरूष आणि महिला हा लिंगभेद दिसून येतो. त्यामुळे आत्मविश्वास या भागातील महिलांमध्ये कमी दिसून येतो.

एखादा व्यवसायही करायचा झाल्यास कच्चामाल खरेदी करण्याची सोय नाही व बनलेल्या मालासाठी विक्रिची पण व्यवस्था नाही. तयार मालाला बाजारभाव येईल किंवा नाही हा मोठा प्रश्न या भागात दिसून येतो. त्यामुळे यांची आर्थिक बाजू मागासलेली आहे.

**४) राजकारण विषयक समस्या :**

नवीन पंचायतराज व्यवस्थेनुसार निवडणुकीत महिलांचा सहभाग असावा म्हणून ठोस प्रयत्न करण्यात आले. त्यापैकी ३३% जागेवर महिला आरक्षणाकरिता प्रावधान आहे. ग्रामीण भागात जर सरपंच महिला असेल तर ती फक्त नावापुरतीच असते. ग्रामपंचायतीशी संबंधीत सर्व कार्य तिचा पती किंवा पुरूष मंडळीच करतात. या महिला अशिक्षित असतील तर शासकीय नियम व कायदयांची माहिती पण या महिलांना नसते.

**५) सामाजिक क्षेत्रातील समस्या :**

ग्रामीण भागात आजही काही प्रमाणात पडदा प्रथा, हुंडा पद्धती अस्तित्वात आहे. ही प्रथा महिलांच्या उन्नतीला बाधक आहे. वयाने लहान मुलींचे लग्न मोठया वयाच्या पुरूषांशी केले जातात. असे लग्न लहान मुलींकरिता अभिशाप बनू शकतात. मुलगा व मुलगी असा लिंगभेद आजही आहे. त्यामुळे लिंगपरिक्षण करून स्त्री भृणहत्या छुप्या मार्गानी होतांना दिसतात. बलात्काराचे प्रमाणही या भागात काही कमी नाहीत. वर्तमान काळातही छुप्या रीतीने अस्पृश्यता, जातीभेद अस्तित्वात आहे. धर्म, प्रथा, रूढी, परंपरा अंधश्रद्धा हे महिलांच्या विकासात बाधा उत्पन्न करीत आहेत.

शासनाच्या अशा कितीतरी योजना आहेत की ज्या वनवासी महिला, दुर्गम, अतिदुर्गम, डोंगराळ भागातील महिला, छोटया खेडयात राहणाऱ्या महिला यांच्या पर्यंत पोहचत नाही. बरेचदा त्यांच्या कार्यात कुटुंबाचा सहयोग नसतो. सामाजिक बंधने, असुरक्षित वातावरण हे महिला विकासाला बाधा निर्माण करतात. शिक्षण व रोजगाराच्या अभावामुळे या क्षेत्रातील युवा मुली नक्षलवादी संघटना, वेश्या व्यवसाय तसेच इतरही गुन्हेगारी संघटनांशी जोडल्या जातात. आरोग्याला हानीकारक गुटखा, तंबाखु, बिड़ी, दारू यांच्या आहारी पण या मुली जातात असे अभ्यासावरून दिसून येते.

महिला सशक्तिकरणासाठी सरकारच्या काही प्रमुख योजना भारतातील प्रत्येक प्रातांत कमी जास्त प्रमाणात आवश्यकतेनुसार राबविल्या जातात.

१) विधवा स्त्रियांच्या मुलींच्या लग्नासाठी आर्थिक सहाय्यता.

२) सहयोग योजना.

३) महिला स्वयंसिद्ध योजना.

४) आंतरजातीय विवाह प्रोत्साहन राशी.

५) विधवा विवाह उपहार योजना.

६) पालनहार योजना.

७) अल्पसंख्यांक मुलीसाठी वसतीगृहे योजना.

८) सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

९) जिजाऊ वसतिगृह योजना.

१०) माझी कन्या भाग्यश्री योजना.

११) मनोर्धर्य योजना.

१२) "बेटी बचाव, बेटी पढ़ाव" योजना.

१३) निराधार महिलांसाठी आधारगृहे योजना.

१४) श्रावणबाळ योजना.

१५) सुकन्या योजना.

१६) देवदासी कल्याण योजना.

१७) शुभमंगल सामुहिक विवाह योजना.

१८) महिला स्वयंरोजगार योजना.

१९) प्रधानमंत्री महिला लोन योजना.

२०) वृद्धावस्था, विधवा/परित्यक्ता पेन्शन योजना.

२१) बेरोजगारी भत्ता.

२२) पाळणाघर योजना.

२३) महिला स्वयंसहायता बचत गट योजना.

२४) बालिका समृद्धी योजना.

२५) जननीसुरक्षा योजना.

२६) किसान जीवन कल्याण योजना.

२७) इंदिरा आवास योजना.

२८) स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना.

२९) साईकिल योजना.

३०) किशोर बालिका योजना.

वरील सर्व योजना महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी असून शहरी, ग्रामीण व अतिदुर्गम भागापर्यंत पोहचल्यास त्यांच्या जीवनविकासाला गतिमानतेने चालना मिळेल व विकासाचे विविधांगी मार्ग लाभून स्त्रीजीवन उन्नत व प्रगत होण्यास कमालीची मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ सूची**

१. डॉ.आर.पी. तिवारी, डॉ.डी.पी.शुक्ला, 'भारतीय नारी: वर्तमान समस्यायें और भावी समाधान', ए.पी. एच.पब्लिशिंग कारपोरेशन, नई दिल्ली, १९९९

२. डॉ.मीनाक्षी व्यास, 'समकालीन भारतीय समाज समस्याएँ और समाधान', विकास प्रकाशन कानपुर, २०१२
३. डॉ.अरविंद महला (संपादक), 'भारत में महिला सशक्तीकरण प्रयास एवं बाधाएँ', मलिक एन्ड कम्पणी, जयपूर, २०१३
४. जयप्रकाश झेंडे, 'व्यक्तिमत्व विकासाच्या उत्कृष्टतेकडे', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८
५. डॉ.संजीव महाजन, 'भारत में ग्रामीण समाज', अर्जुन पब्लिसिंग हाऊस, नई दिल्ली, २०१२
६. डॉ.सौ.जयमाला डुमरे, 'साक्षरता: जाणीव जागृती', जयश्री प्रकाशन, नागपूर, २००५
७. डॉ.आदर्शकुमार, 'महिला विकास कार्यक्रम', खुशी पब्लिकेशन्स, गाजियाबाद, नई दिल्ली, २०११